RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक ६९(२)] मंगळवार, डिसेंबर ४, २०१२/अग्रहायण १३, शके १९३४ [पृष्ठे ८
[ किंमत : रुपये १४.०० ]

## असाधारण क्रमांक १४२

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### विधी व न्याय विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ नोव्हेंबर २०१२

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक इएसटी. २०११/प्र. क्र. ६४७/का.-दोन.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तिंचा वापर करून आणि याबाबतीत केलेले व अंमलात असलेले सर्व नियम, आदेश व अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागातील उप प्रारुपकार-नि-उप सचिव (गट-अ), सहायक प्रारुपकार-नि-अवर

सचिव (गट-अ) आणि कनिष्ठ प्रारुपकार (गट-ब) या पदांच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :

१. या नियमांना, विधी व न्याय विभागातील, " उप प्रारुपकार-नि-उप सचिव (गट-अ), सहायक प्रारुपकार-नि-अवर सचिव (गट-अ) आणि कनिष्ठ प्रारुपकार (गट-ब) (सेवाप्रवेश) नियम २०१२" असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,–

(अ) "सहायक प्रारुपकार-नि-अवर सचिव" म्हणजे शासनाच्या विधी व न्याय विभागातील सहायक प्रारुपकार-नि-अवर सचिव ;

**(ब) " विभाग " म्हणजे शासनाचा विधी व न्याय विभाग ;**

(क) " उप प्रारुपकार-नि-उप सचिव " म्हणजे शासनाच्या विधी व न्याय विभागातील **उप प्रारुपकार-नि-उप सचिव ;**

**(ड) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन ;**

(इ) **" कनिष्ठ प्रारुपकार"** म्हणजे शासनाच्या विधी व न्याय विभागातील **कनिष्ठ प्रारुपकार.**

३. **" उप प्रारुपकार-नि-उप सचिव "** या पदावरील नेमणूक, **" सहायक प्रारुपकार-नि-अवर सचिव "** हे पद **धारण करीत असलेल्या** व या पदावर तीन वर्षांहून कमी **नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तिंमधून, काटेकोर निवडीच्या आधारावर**, ज्येष्ठतेनुसार, **सुयोग्य व्यक्तिच्या पदोन्नतीने** करण्यात येईल.

४. **" सहायक प्रारुपकार-नि-अवर सचिव "** या पदावरील **नेमणूक एकतर,–**

**(अ) " कनिष्ठ प्रारुपकार " हे पद धारण करीत असलेल्या व या पदावर तीन वर्षांहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तिंमधून, ज्येष्ठतेच्या आधारावर, पात्रतेनुसार, सुयोग्य व्यक्तिच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा**

(ब) खालील उमेदवारांमधून नामनिर्देशनाने जे,–

(एक) चाळीस वर्षापेक्षा जास्त वयाचे नाहीत :

परंतु, जे उमेदवार या आधीच शासन सेवेत असतील, अशा उमेदवारांकरिता वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील; आणि

(दोन) खालील पद धारण करीत आहे किंवा धारण केलेले आहे,–

(१) " कनिष्ठ प्रारुपकार " हे पद किमान तीन वर्षे; किंवा

(२) " शासनाच्या विधी व न्याय विभागातील विधी शाखेचे अवर सचिव " हे पद किमान तीन वर्षे; किंवा

(३) " विधी व न्याय विभागाच्या विधी शाखेचे अधीक्षक " हे पद किमान सात वर्षे; किंवा

(४) " कोणत्याही न्यायीक सेवेतील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग) " हे पद किमान पाच वर्षे; किंवा

(५) उच्च न्यायालय किंवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान सात वर्ष अधिवक्ता किंवा सॉलिसिटर.

**स्पष्टीकरण** : उप खंड (५) च्या प्रयोजनार्थ एखादा अधिवक्ता किंवा सॉलिसिटर असलेल्या व्यक्तिच्या कालावधीची परिगणना करताना, ती अधिवक्ता किंवा सॉलिसिटर झाल्यानंतर तिने कनिष्ठ प्रारुपकार किंवा कोणत्याही न्यायिक सेवेतील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग हे पद धारण केले असेल अशा कोणत्याही कालावधीचा समावेश करण्यात येईल :

परंतु, असाधारण शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

५. कनिष्ठ प्रारुपकार या पदावरील नेमणूक खालील उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल जे,—

(अ) बावीस वर्षांपेक्षा कमी वयाचे नाहीत; आणि तेहतीस वर्षांपेक्षा जास्त वयाचे नाहीत; आणि

(ब) विधी व न्याय विभागातील विधी शाखेचे अधीक्षक हे पद किमान तीन वर्षे धारण करीत आहे किंवा धारण केलेले आहे ; किंवा

(क) विधी व न्याय विभागातील विधी शाखेचे सहायक हे पद किमान पाच वर्षे धारण करीत आहे किंवा धारण केलेले आहे ; किंवा

(ड) उच्च न्यायालय किंवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान पाच वर्षे अधिवक्ता किंवा सॉलिसिटर म्हणून काम केलेल्या व्यक्ती ; किंवा

(इ) सांविधिक विद्यापीठाची कायद्याची किमान स्नातकोत्तर पदवी धारण केलेल्या व्यक्ती.

**स्पष्टीकरण** : उप खंड (ड) च्या प्रयोजनार्थ एखादा अधिवक्ता किंवा सॉलिसिटर असलेल्या व्यक्तिच्या कालावधीची परिगणना करतांना, ती अधिवक्ता किंवा सॉलिसिटर झाल्यानंतर तिने कनिष्ठ प्रारुपकार किंवा कोणत्याही न्यायिक सेवेतील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग हे पद धारण केले असेल अशा कोणत्याही कालावधीचा समावेश करण्यात येईल :

परंतु, असाधारण शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

६. सहायक प्रारुपकार-नि-अवर सचिव या पदावरील नेमणुका पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने ५०:५० या प्रमाणात करण्यात येतील.

७. नियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तिचा परिविक्षा कालावधी दोन वर्षाचा असेल. परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त एका वर्षाने वाढविण्यात येईल. या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तिस परिविक्षा कालावधी विहित मुदतीत यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर तिने परिविक्षा कालावधी यशस्विरित्या पूर्ण केला नाही किंवा विहित केलेल्या परिविक्षा कालावधीत ती त्या पदासाठी अपात्र आढळल्यास, तिची सेवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय समाप्त करण्यात येईल.

८. या नियमांमध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नती किंवा नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तिस, जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्यासंबंधी करण्यात आलेल्या नियमांनुसार तिला हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

९. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तिंस, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी संगणक अर्हतेसंबंधी वेळोवेळी केलेल्या तरतुदीनुसार संगणक वापरासंबंधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०. वरील नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सेवेची निकड लक्षात घेऊन आणि पदोन्नतीने पद भरण्यास कोणीही पात्र उमेदवार उपलब्ध नाही याची खात्री केल्यानंतर, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा सहायक पारुपकार-नि-अवर सचिव या पदावर नामनिर्देशनाने भरती करण्याचे जे प्रमाण नियम ६ मध्ये विहीत केले आहे, ते प्रमाण शिथिल करावे असे शासनाच्या मते आवश्यक वाटल्यास, तसे कारण लेखी नमूद करून ते प्रमाण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पूर्वपरवानगीने शिथिल करून शासनास नेमणुका करता येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. ल. आचलिया,
शासनाचे प्रधान सचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 29th November 2012

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. EST 2011/CR. 647/D. II.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders and instruments made in this behalf and in force, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating the recruitment to the post of Deputy Draftsman-*cum*-Deputy Secretary (Group A), Assistant Draftsman-*cum*-Under Secretary (Group A) and Junior Draftsman (Group B) in the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These Rules may be called "the Deputy Draftsman-*cum*-Deputy Secretary (Group A), Assistant Draftsman-*cum*-Under Secretary (Group A) and Junior Draftsman (Group B) in the Law and Judiciary Department (Recruitment) rules, 2012."

2. In these rules, unless the context otherwise requires,

(*a*) "Assistant Draftsman-*cum*-Under Sesretary" means the Assistant Draftsman-*cum*-Under Secretary of the Law and Judiciary Department of the Government;

(*b*) "Department" means the Law and Judiciary Department of the Government;

(*c*) "Deputy Draftsman-*cum*-Deputy Secretary" means the Deputy Draftsman-*cum*-Deputy Secretary of the Law and Judiciary Department of the Government;

(*d*) "Government" means the Government of Maharashtra;

(*e*) "Junior Draftsman" means the Junior Draftsman of the Law and Judiciary Department of the Government.

3. Appointment to the post of "Deputy Draftsman-cum-Deputy Secretary" shall be made by promotion of a suitable person on the basis of strict selection with due regard to seniority from amongst the persons holding the post of "Assistant Draftsman-*cum*-Under Sesretary", having not less than three years regular service in that post.

4. Appointment to the post of "Assistant Draftsman-*cum*-Under Secretary" shall be made either,-

(*a*) by promotion of a suitable person on the basis of Seniority subject to fitness from amongst the persons holding the post of "Junior Draftsman" having not less than three years regular service in that post; or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*I*) are not more than forty years of age:

Provided that, the age limit may be relaxed by five years in case of candidates who are already in service of Governnment; and

(*II*) are holding or have held the post of–

**(*i*) 'Junior Draftsman' for a period of not less than three years; or**

**(*ii*) 'Under Secretary to Government on the Legal Side of the Law and Judiciary Department' for a period of not less than three years; or**

**(*iii*) 'Superintendent on the Legal Side of the Law and Judiciary Department' for a period of not less than seven years; or**

**(*iv*) 'Civil Judge (Junior Division) and Judicial Magistrate of the First Class in any Judicial Service' for a period of not less than five years; or**

**(*v*) have been Advocates or Solicitors in a High Court or Courts sub-ordinate thereto for a period of not less than seven years.**

*Explanation* :–**For the purpose of sub-clause (*v*), in computing the period during which a person has been an Advocate or Solicitor, there shall be included any period during which the person has held the post of Junior Draftsman or Civil Judge** (Junior Division) and Judicial Magistrate of the First Class in any Judicial Service, after he became Advocate or Solicitor:

Provided that, the upper age limit may be relaxed in favour of persons possessing exceptional educational qualifications or experience or both.

5. Appointment to the Post of Junior Draftsman shall be made by nomination from amongst persons who,-

(*a*) are not less than twenty-two years of age; and not more than thirty-three years of age; and

(*b*) are holding or have held the post of Superintendent on the Legal Side of the Law and Judiciary Department, for a period of not less than three years; or

(*c*) are holding or have held the post of Assistant on the Legal Side of the Law and Judiciary Department, for a period of not less than five years; or

(*d*) have been Advocates or Solicitors in a High Court or Courts subordinate thereto, for a period of not less than five years; or

(*e*) possess at least Master's degree in law of statutory university.

*Explanation* :–For the purpose of sub-clause (*d*), in computing the period during which a person has been an Advocate or Solicitor, there shall be included any period during which the person has held the post of Junior Draftsman or Civil Judge (Junior Division) and Judicial Magistrate of the First Class in any Judicial Service, after he became Advocate or Solicitor:

Provided that, the upper age limit may be relaxed in favour of persons possessing exceptional educational qualifications or experience or both.

6. The appointment to the Post of Assistant Draftsman-*cum*-Under Secretary, by promotion and by nomination, shall be made in the ratio of 50:50

7. A person appointed to the post mentioned in rule 4 and 5 by nomination shall be on probation for the period of two years. Probation period may be extended maximum upto one year only. Person appoined to the post shall be required to complete his probation successfully within prescribed period. If he could not complete the probation successfully or found unsuitable for the post within prescribed probation period, he shall be liable to be terminated from the service without prior notice.

8. A person appointed to the post mentioned in these rules, whether

by promotion or nomination , shall be required to pass examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

9. A person appointed to the post mentioned in rules 3, 4 and 5 shall possess a certificate in computer operation prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time.

10. Notwithstanding anything contained in these rules, the opinion of the Government, that the exigencies of services so requires the Government may for reasons to be recorded in writing and after ascertaining that no qualified person is available for being appointed by promotion whereever necessary, make appointment to the post of Assistant Draftsman-cum-Under Secretary by nomination in relaxation of the ratio prescribed in rule 6 in consultation with the Maharashtra Public Service Commission.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY L. ACHLIYA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.